# पिंपरी चिंचवड महानगरपालिका
## ग प्रभाग कार्यालय
## कार्यपत्रिका क्रमांक - ६
## सभावृत्तांत

दिनांक - ३/९/२०१८ वेळ - **सकाळी** ११:०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या **ग** प्रभाग समितीची मासिक सभा सोमवार दि.०३/०९/२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता ग प्रभाग कार्यालयाचे **"ग्रामदैवत बापुजी बुवा सभागृह"** येथे आयोजीत करणेत आली होती सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

१. **मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन - सभापती**
२. मा.पवार मनिषा प्रमोद
३. मा.बारणे अर्चना तानाजी
४. मा.अभिषेक गोविंद बारणे
५. मा.कैलास ऊर्फ बाबा भालचंद्र बारणे
६. मा.भोसले सचिन सुरेश
७. मा.सविता बाळकृष्ण खुळे
८. मा.चंद्रकांत बारकु नखाते
९. मा.संदिप काशिनाथ गाडे - स्विकृत सदस्य
१०. मा.गोपाळ काशिनाथ माळेकर - स्विकृत सदस्य
११. मा.विनोद हनुमंत तापकिर - स्विकृत सदस्य

तसेच खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

श्रीमती स्मिता झगडे – क्षेत्रिय अधिकारी**, श्री.आर.बी.जगताप – प्रशासन अधिकारी,**श्री.रामदास तांबे - कार्यकारी अभियंता (पाणीपुरवठा), श्री.सुपे ए के - लेखा अधिकारी, श्री.व्ही.एम.गायकवाड – मुख्य लिपिक, श्री.एस.एस.कुलकर्णी – सहा.आरोग्य अधिकारी, श्री.दिलीप धुमाळ – उप अभियंता,विद्युत, श्री ओहोळ व्ही.बी. - उपअभियंता स्थापत्य, श्री.आर.के.जावळे – उप अभियंता जलनि:सारण, श्री.एम एम तावरे –कनिष्ठ अभियंता नगररचना, श्री.बंडगर एस बी – कनिष्ठ अभियंता,जलनि:सारण, श्री.इनामदार एस जी. – मुख्य आरोग्य निरीक्षक,श्री.मगर एस एम – किनष्ठ अभियंता, जलनि:सारण, श्री.कोरेवार एस – कनिष्ठ अभियंता,स्थापत्य, श्री.मगर ए ए – क्रीडा पर्यवेक्षक, श्री.मोमीन ए. ए , श्रीम.सानप ए.व्ही, श्रीम.घोडके पी पी,श्री.गजपुरे व्ही पी, कलाल आय के – कनिष्ठ

अभियंता स्थापत्य, श्री.शरद मोरमारे – कनिष्ठ अभियंता पाणीपुरवठा, श्री.गणेश राऊत - कनिष्ठ अभियंता, विद्युत, श्री.बी के तापकिर – वृक्षसंवर्धन, श्री.सरवदे - अतिक्रमण अधिक्षक इ. कर्मचारी उपस्थित होते.

-----

सर्व सन्मा.सदस्य व अधिकारी यांचे स्वागत करुन सभेला सुरवात करणेत येत आहे.

दि. ६/८/२०१८ चे मासिक सभेचा सभावृत्तांत ( कार्यक्रमपत्रिका क्र. ५) कायम करणेत येत आहे.

**<u>सभा कामकाजात ऐनवेळी दाखल करुन घेणेत आलेला विषय खालीलप्रमाणे</u>**

ठराव क्रमांक - २१ विषय क्रमांक- १

दिनांक- ३/०९/२०१८

सूचक- मा.मनिषाताई पवार अनुमोदक – मा.कैलास बारणे

**संदर्भ –** मा.अर्चना बारणे यांचे दिनांक ०३/०९/२०१८ चे पत्र

मा.अर्चना बारणे यांचे दिनांक ०३/०९/२०१८ चे पत्रानुसार प्रभाग क्र. २३ थेरगाव गावठाण कमानिशेजारी कार्यरत असलेले जेष्ठ नागरिकांचे विरंगुळा केंद्र, महिला बचत गट व कार्यशाळा, थेरगाव पोलिस चौकी थेरगाव डेव्हलपमेंट कमिटी यांचे ऑफिस असुन त्यासंदर्भात सदर ठिकाणी नामफलक बसविणेत यावा व हे प्रभागातील चारही नगरसदस्य यांच्या प्रयत्नातुन करण्यात आले असा उल्लेख करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

------

**दि. ३/०९/२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता ग प्रभाग कार्यालयाचे मासिक सभेत खालीलप्रमाणे चर्चा झाली.**

**मागील मासिक सभेत झालेल्या विषयांचा आढावा घेण्यात आला.**

**मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन (अध्यक्ष) -** मागील आठवडयात अतिक्रमण संदर्भात काय कारवाई केली याची माहिती द्यावी.

**श्री. सरवदे (अतिक्रमण अधिक्षक) -** दि.१८/८/२०१८, २३/८/२०१८,२७/८/२०१८ व २९/८/२०१८ रोजी प्रभाग क्र.२३,२४ व २७ मध्ये कारवाई करणेत आली आहे. एकुण हातगाडया१७, १ चारचाकी वाहन, २ टप-या, ४ काऊंटर, २ लोखंडी जाळी, २ लोखंडी टेन्ट तसेच प्रभागातील फ्लेक्स बॅनर्स काढण्यात आले आहेत.

**मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन (अध्यक्ष) -** रहाटणी फाटा ते रहाटणी गाव, नखाते वस्ती ते डी मार्ट या परिसरात लोकांना चालायला सुध्दा जागा राहत नाही, एवढया हातगाडयांची संख्या वाढलेली आहे.
प्रभाग क्र.२४ मध्ये नवीन भाजीमंडईसाठीचे ठरावाबाबत काय झाले ?

गणपती स्टॉलसाठी नवमहाराष्ट्र, डांगे चौक येथे जागा निश्चीत करुन देणेत यावी.

**श्रीमती स्मिता झगडे ( प्रभाग अधिकारी) –** ज्या रस्त्यांवर गणपती स्टॉल्स लावणेबाबत परवानगी दिलेली आहे, ती यादी अतिक्रमण विभागाने प्राप्त करुन घ्यावी.

**मा.संदिप गाडे –** नामनिर्देशित सदस्यांच्या नामफलकाबाबत आयुक्तांचे काय परिपत्रक आहे, याची योग्य ती माहिती घेऊन नंतर कारवाई करणेत यावी. आजी नगरसदस्यांचे नावाचे बोर्ड न काढता माजी सदस्यांचे बोर्ड काढण्यात यावे, अशा प्रकारचे परिपत्रक आहे.

**मा.सविता खुळे -** प्रभाग क्र.२७ डि मार्ट ते रहाटणी फाटा लाईट बंद आहेत, ते लवकरात लवकर सुरु करण्यात यावे.

**मा.संदिप गाडे –** मनपाच्या काही विभागांमध्ये (जलनि:सारण) पत्र दिल्यानंतर शिक्के नाहीत म्हणुन पोहोच दिली जात नाही.

**श्रीमती स्मिता झगडे ( प्रभाग अधिकारी) –** ज्या विभागाकडे शिक्के उपलब्ध नाहीत, त्यांनी लवकरात लवकर शिक्के बनवुन घ्यावे. तोपर्यंत लेखी स्वरुपात पत्र मिळाल्याची पोहोच लिहुन देण्यात यावी.

**मा.विनोद तापकिर –** सफाई कर्मचा-यांकडुन कॉलनीतील रोड पण झाडण्यात यावे.

**श्री.एस एस कुळकर्णी (सहा.आरोग्य अधिकारी) –** खाजगी रोड झाडणेस सांगणेत येत नाही.

**मा.अर्चना बारणे –** अनेकवेळा पत्र देऊनही धुराची गाडी वेळेवर फिरत नाही.

**श्रीमती स्मिता झगडे ( प्रभाग अधिकारी) –** मा.बारणे मॅडम यांनी दिलेल्या पत्रानुसार कार्यवाही करणेत यावी. Rotation प्रमाणे धुराची गाडी फिरविण्यात यावी.

**श्री.एस एस कुळकर्णी (सहा.आरोग्य अधिकारी) -** पावसामुळे धुरिकरणाची गाडी फिरविली जात नव्हती. येथुन पुढे Rotation प्रमाणे गाडी फिरविण्यात येईल.

**मा.चंद्रकांत नखाते -** ग प्रभाग स्थापन होऊन १ वर्ष झाले तरीही विद्युत विभागाने नवीन माईकची व्यवस्था केलेली नाही. जुने स्थायी समिती सभागृहातील माईक ग प्रभागातील सभागृहात बसविणेत आलेले आहे. सदर माईक नादुरुस्त अवस्थेत असुन त्यातुन नीट आवाज येत नाही. माईक साठी काही तरतुद असल्यास ती तपासुन सदर माईक बदलुन घ्यावे. तसेच यापुर्वीही सांगितलेप्रमाणे ग प्रभाग कार्यालयास लिफ्टची व्यवस्था करण्यात आली नाही.

**श्री.ओहोळ व्ही.बी (उपअभियंता, स्थापत्य) –** सद्यस्थितीतील ग प्रभाग कार्यालयाची जागा हि शाळेची असल्यामुळे लिफ्ट बसविण्यात आलेली नाही. तरीही **Building Permission** विभागाकडे हा विषय प्रलंबित आहे तसेच बहुउद्देशीय इमारतीचे काम सुरु आहे.

**श्रीमती स्मिता झगडे ( प्रभाग अधिकारी) –** नवीन बहुउद्देशीय इमारतीचे काम झाल्यानंतर ग प्रभाग कार्यालय हे नवीन इमारतीत स्थलांतरीत होईल. शाळेसाठी लिफ्ट देता येत नसल्यामुळे सदर लिफ्ट बंद ठेवावी लागेल.

**मा.चंद्रकांत नखाते –** प्रभाग क्र. २७ येथील तांबे शाळा, समता कॉलनी येथे प्यायला पाणी नाही. सदर ठिकाणी नागरिकांच्या टाक्यांमध्ये १ फुट सुध्दा पाणी नाहीये. त्याचप्रमाणे सुयोग कॉलनी येथे सुध्दा ४ महिन्यापासुन पाण्याची तक्रार आहे. सदर ठिकाणी डिझाईन बनविणेकामी १ वर्षाचा कालावधी जाईल, तरी तुर्तास तेथे लवकरात लवकर योग्य पाणीपुरवठयाची व्यवस्था करण्यात यावी. सध्या Booster बसविण्यात यावे व नंतर इतर नियोजन करण्यात यावे. काळेवाडी फाटयाला असलेल्या वॉलवर लोकांना पाणीपुरवठा व्यवस्थीत होत नाही. पाणी हि रोज लागणारी गोष्ट आहे. टँकरसाठीचे टेंडर अद्याप का काढले नाही? यासाठी २ महिने आधी तयारी करणे गरजेचे होते.

**श्री.रामदास तांबे - कार्यकारी अभियंता (पाणीपुरवठा) –** यासाठी तातडीने टेंडर काढण्यात येईल. **Booster** चे संदर्भात **Fisibility** मुळे आहे ते काम बिघडुन जाईल. अमृत योजनेअंतर्गत काम चालु झाल्यानंतर काम सुरळीत होईल.

**मा.अर्चना बारणे** - शिवतिर्थ नगर, दगडु पाटील नगर, संदिप नगर येथे पाण्याचे प्रेशर कमी आहे.

**मा.मनिषा पवार –** पडवळ नगर, वहिनीसाहेब कॉलनी, श्रीकृष्णनगर, पानसरे कॉलनी येथे कमी प्रेशरने पाणी येते.

**मा.कैलास बारणे –** गुजर वस्ती- लक्ष्मण नगर येथील २५ लाख लीटरची टाकी पाडण्याच्या कामाचे काय झाले?

**श्री.रामदास तांबे -** कार्यकारी अभियंता (पाणीपुरवठा) - सर्व प्रभागातील पाण्याचे डिस्ट्रीब्युशन सुरळीत झाल्यानंतर, तसेच शट डाऊन झाल्यानंतर सदर काम मार्गी लागेल.
पुर्वी चर्चा झाल्याप्रमाणे डिझाईन तयार आहे.

**मा.चंद्रकांत नखाते –** अमृत योजनेचे काम हे सुरुवातील प्रभाग क्र.२३ मध्ये करणेत यावे.

**मा.मनिषा पवार –** पानसरे कॉलनी येथे ड्रेनेजचे काम करण्यात यावे.

**मा.चंद्रकांत नखाते** – ड्रेनेजचे काम चांगले झाले आहे, पुर्वी वर्षभरामध्ये ५० तक्रारी यायच्या परंतु गेल्या २-४ महिन्यामध्ये तक्रारींचे प्रमाण कमी झाले आहे.
परंतु आरोग्य विभागाच्या तक्रारींचे प्रमाण कमी झालेले नाही.
रहाटणीगाव,गंगानगर,विमल गार्डन, रायगड कॉलनी, रहाटणी फाटा या ठिकाणी रोज कचरा साचतो. सदर ठिकाणी सी सी टी व्ही बसविण्यासंदर्भात कार्यवाही का झालेली नाही.

**श्री.एस एस कुळकर्णी (सहा.आरोग्य अधिकारी) –** सकाळ व दुपार या दोन सत्रांमध्ये कचरा गोळा करण्याचे काम सुरु आहे. Tata Ace गाडयांमार्फत घरोघरचा व व्यवसाय कचरा गोळा करण्यात येतो.

**श्रीमती स्मिता झगडे ( प्रभाग अधिकारी) –** यासंदर्भात मा.आयुक्त यांचे बरोबर मिटींग झाली असुन, कचरा साचत असलेली ठिकाणे नष्ट करण्यात येऊन त्याचे ब्युटिफिकेशन करण्यात येईल, तसेच तेथील सदर ठिकाणी कचरा टाकणा-या लोकांना दंड करण्यात येईल. यासंदर्भात सी सी टी व्ही कॅमेराज बसविणे व रात्री कचरा उचलणे याबाबत कार्यवाही सुरु आहे. सध्या कचरा उचलणेकरीता गाडया कमी आहेत. यासाठी रात्री एक राऊंड घेण्यात येईल व त्यामुळे सकाळचा लोड सुध्दा कमी होईल.

**मा.कैलास बारणे -** प्रत्येक वॉर्डमध्ये स्वतंत्र कचरा संकलन केंद्र करण्यात यावे. शाळेच्या मैदानामध्ये कचरा गाडया लावण्यात येतात, त्यामुळे लहान मुलांना कच-याचा वास येतो. सदर कचरा गाडया लवकरात लवकर हलविण्यात याव्या.

**श्री.एस एस कुळकर्णी (सहा.आरोग्य अधिकारी) -** नियोजित कचरा संकलन केंद्र या ठिकाणी डीपीचे काम सुरु आहे.

**मा.संदिप गाडे** - मागील सभेमध्ये सांगितलेप्रमाणे LED संदर्भात माहिती देणेत आलेली नाही.

**श्री.गणेश राऊत (कनिष्ठ अभियंता, विद्युत) –** पुढील सभेचे वेळी सदर माहिती देणेत येईल.

**मा.चंद्रकांत नखाते** – चायनिज वेस्टेजकरीता १ गाडी रात्री फिरविण्यात यावी. उदा.नखाते वस्ती, पोलिस कॉलनी, शेवंता गार्डन इत्यादी. यामुळे कुत्र्यांची संख्यादेखील कमी होईल.

**श्रीमती स्मिता झगडे ( प्रभाग अधिकारी) –** १ तारखेपासुन दंड करायला सांगणेत आला आहे. आतापर्यंत प्लास्टीक साठी ८५०००/- ,रस्त्यांवर कचरा टाकणा-यांवर २५०००/- दंड करण्यात आला आहे. तरी दंड वाढविण्याकरीता देखील शिफारस केली आहे.

**मा.बाबासाहेब त्रिभुवन –** चायनिजगाडया व हातगाडयांवर कारवाई करणेत यावी.

**मा.विनोद तापकीर –** सदर चायनिजच्या गाडया अधिकृत आहेत का याची चौकशी करण्यात यावी.

**श्रीमती स्मिता झगडे ( प्रभाग अधिकारी) –** अतिक्रमण विभागाने हातगाडया हटविण्यासाठी नोटीस द्यावी.

**मा.चंद्रकांत नखाते** – नवीन रुजु झालेल्या अधिका-यांनी सन्माननीय सदस्यांना भेटुन त्यांचे प्रश्न जाणुन घ्यावे.

**श्री. सरवदे (अतिक्रमण अधिक्षक) -** श्री.इंगळे व श्री निकम – कार्यकारी अभियंता (बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम विभाग अतिक्रमण निर्मुलन व नियंत्रण विभाग) साहेबांनी सांगितलेप्रमाणे कारवाई करण्यात येते.

**मा.चंद्रकांत नखाते** – रहाटणी फाटा ते नखाते वस्ती या मार्गादरम्यान असलेल्या Divider मध्ये झाडे लावणेत यावी. चार महिन्यापासुन सदर ठिकाणी झाडे लावण्यास सांगण्यात आले असुनही झाडे लावणेत आलेले नाही. पावसाळा संपायच्या आत सदर ठिकाणी झाडे लावण्यात यावी.

**श्री.बी के तापकिर – (वृक्षसंवर्धन)** – बोगनवेल ची रोपं उपलब्ध झाली की लावण्यात येतील.

**श्रीमती स्मिता झगडे ( प्रभाग अधिकारी) –** २ महिन्यापुर्वी आपली दोन लोक येथे नेमण्याबाबत सांगण्यात आले हाते, त्याबाबत काय झाले?

**श्री.बी के तापकिर – (वृक्षसंवर्धन) -** आपत्कालीन परिस्थितीसाठी कर्मचारी नेमणेबाबत उद्यान विभागास पत्र द्यावे लागेल.

वरीलप्रमाणे नेमुन देण्यात आलेल्या कामकाजाचा आढावा पुढील बैठकीमध्ये घेण्यात येईल असे सांगुन सर्वांचे आभार मानुन मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

**अध्यक्ष**
**ग प्रभाग समिती**
**थेरगाव– ३३.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
ग क्षेत्रीय कार्यालय, थेरगाव - ३३
क्र-गक्षेका/कावि/४/ /२०१८
दिनांक - /०९/२०१८

**प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा)**
**क्षेत्रीय कार्यालय,**
**थेरगाव – ३३**

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी

२/- आपले विभागाशी संबंधित असणा-या विषयाबाबत झालेल्या ठरावानुसार नियमाधीन कार्यवाही करणेत यावी, यासंदर्भात वेगळा पत्रव्यवहार केला जाणार नाही